# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डीक्र.dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com

जा.क्र./शिउस/पुवि/उमा/२०१६/ ६३०४ दिनांक 31 MAY 2016

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,(सर्व)
सर्व कनिष्ठ महाविदयालय पुणे,अहमदनगर व सोलापूर.

विषय :- इ.११ वी प्रवेश नियमाप्रमाणे ऑनलाईन करणेबाबत.

संदर्भ :- श्रीम.वैशाली बाफना,सिस्कॉम,पुणे यांचा दि ३१.०५.२०१६ अर्ज.

वरील संदर्भीय विषयानुसार मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सिस्कॉम,पुणे या संस्थेने इ.११ वी प्रवेशप्रक्रिया नियमाप्रमाणे पार पाडणेबाबत पत्र देवून विनंती केलेली आहे.

त्यासअनुसरुन आपणांस सूचित करणेत येते की, इ.११ वी प्रवेशप्रक्रियेवेळी प्रवेश देताना कनिष्ठ महाविदयालयांनी बेकायदा प्रवेश देवू नये, तसेच बेकायदा शुल्क आकारणी करु नये, प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देवू नयेत, आरक्षित जागेवर प्रवेश दिल्यानंतर अवाजवी शुल्क आकारणी करण्यात येवू नये, याबाबत दक्षता घेण्यात यावी. मंजूर तुकडयापेक्षा अधिक प्रवेश देण्यात येवू नयेत. शासनाच्या नियमांचे उल्लंघन केल्यास आपल्या कनिष्ठ महाविदयालयाची मान्यता रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

वेळोवेळी शासनाने कनिष्ठ महाविदयालय स्तरावरील प्रवेशासाठी जे शासन निर्णय काढले आहेत त्याची नियमाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

(रामचंद जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे